# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 16.12.2025 वार- मंगळवार

---

**पुणे लिट फेस्ट**

ज्ञान हा भारतीय संस्कृतीचा आधार असल्यानं भारतीय संस्कृती निरंतर आहे. ज्ञान दृष्टी प्राप्त करण्यासाठी साहित्य महत्त्वाचं आहे, असं प्रतिपादन बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी केलं. पुणे पुस्तक महोत्सवाअंतर्गत आयोजित पुणे लिट फेस्टचं उद्घाटन खान यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलते होते.

वाचा, ऐका आणि भारत समजून घ्या ही पुणे लिट फेस्टची संकल्पना आहे असं राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद मराठे यांनी या कार्यक्रमात सांगितलं. तर तरुण वाचतात हे या महोत्सवाने सिद्ध केल्याचं महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यावेळी म्हणाले.

**पिफ**

24 वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात पिफ 15 ते 22 जानेवारी दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. पिफचे संचालक, ज्येष्ठ चित्रप दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते गुरुदत्त यांची जन्मशताब्दी ही महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना असेल. महोत्सवात जागतिक आणि मराठी चित्रपटांसह एकंदर 140 चित्रपट दाखवले जातील अशी माहिती जब्बार पटेल यांनी दिली.

**पुरस्कार**

अमेरिकेत स्थायिक झालेल्या मराठी माणसांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र फाउंडेशनचे पुरस्कार जाहीर झाले असून येत्या 17 जानेवारीला पुण्यात पुरस्कार प्रदान समारंभ होणार आहे अरुण खोपकर, निखिलेश चित्रे, विनय नारकर, ऋत्विक व्यास, लीलाताई चितळे, प्रा. जावेद पाशा, दत्ता देसाई आणि मनिष राय चौधरी यांना विविध क्षेत्रातील कार्यासाठी सन्मानित केलं जाणार आहे.

**पंचायतराज**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत पुरंदर तालुक्यातल्या आडाची वाडी गावातल्या विविध विकासकामांचे, पाणंद रस्त्याचे भूमिपूजन आणि लोकार्पण जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या हस्ते झालं. यावेळी पाटील यांनी गावातील प्रगतीपथावर असलेल्या विकासकामांची पाहणी केली.

**मनपा आयुक्त**

पुणे शहराच्या विकास आराखड्यामध्ये प्रस्तावित असलेल्या महत्त्वाच्या 10 रस्त्यांची यादी महापालिकेनं तयार केली आहे. त्यासाठी महापालिकेच्या पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात निधीची स्वतंत्र तरतूद केली जाईल असं महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितलं.

**निवडणूक**

पुढच्या महिन्यात होणाऱ्या महापालिका निवडणुकीसाठी पुणे महापालिकेच्या प्रशासनातर्फे तयारी सुरु करण्यात आली आहे. आचारसंहिता लागू झाल्यामुळे शहरातील लोकप्रतिनिधींच्या नावांच्या पाट्या झाकण्याचे आणि विविध फ्लेक्स काढण्याचे काम सुरू झाले आहे. पुण्याची मतदारसंख्या 35 लाख 51 हजार 469 असून, निवडणुकीसाठी 4 हजार 50 मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत. राज्य सरकारनं सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून 15 उपजिल्हाधिकारी आणि 15 तहसीलदार दर्जाचे अधिकारी नियुक्त केले आहेत.

**निवडणूक-काँग्रेस,शिवसेना**

पुणे महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेसतर्फे नऊ जणांची समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. माजी राज्यमंत्री रमेश बागवे समितीचे प्रमुख असून अरविंद शिंदे, बाळासाहेब शिवरकर, मोहन जोशी, ॲड. अभय छाजेड, दीप्ती चौधरी, संजय बालगुडे, कमल व्यवहारे, दत्ता बहिरट या नेत्यांचा समितीमध्ये समावेश आहे.

दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि मनसेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची  काल पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी चर्चा झाली. चर्चेत शिवसेनेतर्फे संजय मोरे, गजानन थरकुडे, अशोक हरणावळ, वसंत मोरे, प्रशांत बधे तर मनसेतर्फे साईनाथ बाबर, बाबू वागस्कर, बाळा शेडगे सहभागी झाले होते.

**पिंपरी चिंचवड निवडणूक**

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगानं उमेदवारी अर्ज भरताना महापालिकेकडून आवश्यक असलेला ना हरकत दाखला उमेदवारांना सुलभरीत्या मिळावा, यासाठी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर विशेष ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेमुळे इच्छुक उमेदवारांना आता घरबसल्या ना हरकत दाखल्यासाठी अर्ज दाखल करता येणार आहे.

**विजय दिवस**

पुण्यातील लष्कराच्या दक्षिण मुख्यालयातर्फे आज विजय दिन साजरा करण्यात आला. लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करुन 1971 च्या भारत पाकिस्तान युद्धातील शूर योद्ध्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

विजय दिवसानिमित्त या युद्धात सहभागी झालेल्या निवृत्त लष्करी कर्मचाऱ्यांचा तसंच वीर नारींचा सन्मान करण्यात आला.

**मोकाट श्वान**

पिंपरी चिंचवड शहरातील जे नागरिक आणि प्राणीप्रेमी मोकाट श्वानांना नियमितपणे अन्न खाऊ घालतात, त्यांनी त्याबाबतचा अर्ज 31 डिसेंबरपर्यंत महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे सादर करावा, असं आवाहन महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागानं केलं आहे.
अर्जाचा नमुना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची माहिती पशुवैद्यकीय विभागाचे उप आयुक्त संदीप खोत यांनी दिली.

**नाणी प्रदर्शन**

इंटरनॅशनल कलेक्टर्स सोसायटी ऑफ रेअर आयटम्स या संस्थेनं येत्या  19 ते 21 डिसेंबर या कालावधीत दुर्मिळ नाण्यांच्या प्रदर्शन आयोजित केलं आहे. 'कॉईनेक्स पुणे 2025' या नावाचं हे प्रदर्शन कर्वे रस्त्यावरील सोनल हॉलमध्ये सकाळी 10 ते संध्याकाळी 7 या वेळेत विनामूल्य पाहता येईल. शिवाजी महाराजांच्या काळातील विविध दुर्मिळ नाण्यांचा खजिना रसिकांना या प्रदर्शनातून अनुभवता येईल, अशी माहिती संस्थेतर्फे आज पत्रकार परिषदेत देण्यात आली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज किमान 9 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता. ताज्या पुणे वृत्तांतसह नमस्कार.**